वर्ष: १ | अंक: १

पाथेय

शिदोरी, भारतीय ज्ञानपरंपरेची...



पाथेय
शिदोरी, भारतीय ज्ञानपरंपरेची...

अनुक्रमणिका

१ . प्रस्तावना


२ . प्राचीन भारतीय शस्त्रपरंपरा (डॉ. चैतन्य साठे)

३ . दिवाळीच्या फटाक्यांचा इतिहास (अद्वैत करजगी)

४ . परिचय : भारतविद्या अभ्यासक

५ . शब्द कोडे

६ . सांस्कृतिक आणि बौद्धिक परंपरेचा जागतिक गौरव



प्रकाशक :
पाथेय भारतविद्या फाउंडेशन
१७३०, सदाशिव पेठ, पुणे – ४११०३०
मो. : +९१ ९८२२०९१६५८
ईमेल : pathey.bharatvidya@gmail.com
आवेदन क्रमांक : T/MH/2026/1030/2742/1584
प्रकाशन : **कार्तिक शुद्ध प्रतिपदा, शके १९४८**
संपादन :
सुमित डोळे व कोमल धायरकर

प्रस्तावना

पाथेय भारत विद्या फाउंडेशनच्या माध्यमातून 'पाथेय' हे त्रैमासिक आपल्या हातात देताना आम्हाला अतिशय आनंद होत आहे.

भारतीय कला, संस्कृती, तत्त्वज्ञान, इतिहास, लोकजीवन याची साधार मांडणी करावी , या भूमीतून जन्माला आलेल्या विचारधारांची समन्वयात्मक मांडणी व्हावी , ही मांडणी सोप्या भाषेत समाजातील सर्व स्तरांपर्यंत पोहोचवता यावी, या कल्पनेतून पाथेय चा जन्म झाला. त्यासाठी जुन्या व नव्या सर्व माध्यमांचा उपयोग करावा अशा भूमिकेतून या विषयातील काही तरुण अभ्यासक व या विषयावर प्रेम असणारे काही जण एकत्र येऊन त्यांनी याला मूर्त रूप दिले. गेली दोन वर्षे इंस्टाग्राम, फेसबुक व youtube यासारख्या समाज माध्यमातून हे काम चालू आहे.

आता पाथेय दर तीन महिन्यांनी आपल्या भेटीला येईल ते या त्रैमासिकाच्या माध्यमातून. भारत विद्येच्या विषयात काम करणाऱ्या तरुणांना त्यांचे काम मांडण्यासाठी व ते सर्वांपर्यंत पोहोचवण्यासाठीचे व्यासपीठ म्हणून याचा नक्की उपयोग होईल, असा आम्हाला विश्वास वाटतो.

तसेच सर्व वाचकांचे प्रेम पाथेयला मिळावे ही ईश्वरचरणी प्रार्थना करतो. या सगळ्या मागे आमच्या मनात हे मात्र नक्की आहे की,

इतिहासाचे अवघड ओझे,
डोक्यावर घेऊनी ना नाचा.
करा पदस्थल त्याचे आणिक,
चढून त्यावर भविष्य वाचा.

दिपोत्सवाच्या सर्वांना खूप साऱ्या शुभेच्छा !

या पुढचे अंक ...

माघ कृष्ण प्रतिपदा, **गुरु प्रतिपदा** (२१ फेब्रुवारी २०२७)

चैत्र शुद्ध प्रतिपदा, **गुढीपाडवा** (७ एप्रिल २०२७)

आषाढ शुद्ध प्रतिपदा, **कालिदास दिन** (४ जुलै २०२७)

कार्तिक शुद्ध प्रतिपदा, **दिवाळी** (३० ऑक्टोबर २०२७)

या दिवशी प्रकाशित होतील...

प्राचीन भारतीय शस्त्रपरंपरा

(साहित्य, पुरातत्त्व, शिल्पकला आणि युद्धतंत्र यांच्या संदर्भात एक संक्षिप्त अभ्यास)

डॉ.चैतन्य अरुण साठे

प्राचीन भारतीय शस्त्रपरंपरा ही भारतीय इतिहास, तंत्रज्ञान, युद्धकला आणि सांस्कृतिक परंपरेचा महत्त्वपूर्ण भाग आहे. शस्त्रांचा विकास हा केवळ युद्धाच्या गरजांशी संबंधित नसून तो मानवी जीवनशैली, धातुकर्म, राजकीय सत्ता, सैन्यसंघटना आणि धार्मिक प्रतीकवाद यांच्याशीही निगडित आहे. प्रागैतिहासिक काळातील दगडी हत्यारांपासून सिंधू संस्कृतीतील तांब्या-कांस्याच्या वस्तूंपर्यंत आणि पुढील काळातील लोखंडी शस्त्रांपर्यंत भारतीय शस्त्रपरंपरेचा विकास विविध टप्प्यांत झाला. प्राचीन भारतीय शस्त्रांचा अभ्यास करण्यासाठी वेद, रामायण, महाभारत, पुराणे, कौटिलीय अर्थशास्त्र, धनुर्वेदपरंपरा, पुरातत्त्वीय अवशेष, मंदिरशिल्पे आणि चित्रकला हे महत्त्वाचे स्रोत आहेत. या स्रोतांच्या तुलनात्मक अभ्यासातून शस्त्रांचे तांत्रिक स्वरूप तसेच त्यांचे सामाजिक, धार्मिक आणि सांस्कृतिक महत्त्व समजून घेता येते.

प्राचीन भारतीय शस्त्रांचा विकास

प्रागैतिहासिक काळात दगडांपासून तयार केलेली हस्तकुऱ्हाड, धारदार पाती, टोके आणि सूक्ष्म हत्यारे यांचा उपयोग शिकार, अन्नप्रक्रिया आणि स्वसंरक्षणासाठी केला जात असे. या सर्व साधनांना युद्धशस्त्रे मानता येत नसले, तरी शस्त्रतंत्रज्ञानाच्या प्रारंभिक विकासाचा अभ्यास करण्यासाठी ती महत्त्वाची आहेत.सिंधू संस्कृतीच्या काळात तांबे आणि कांस्याच्या वस्तूंचे उत्पादन विकसित झाले होते. या काळातील काही धातूंच्या वस्तूंचा संबंध भाले, कुऱ्हाडी किंवा इतर संभाव्य शस्त्रांशी जोडला जातो. पुढे ताम्रपाषाणयुगीन संस्कृती आणि लोखंडाच्या वाढत्या वापरामुळे शस्त्रनिर्मितीमध्ये विविध बदल झाले. लोखंडी पाती, भाले आणि बाणांची टोके तयार करण्यासाठी धातुकर्म, घडणावळ आणि धार देण्याचे तंत्र महत्त्वाचे ठरले. या विकासाचा वेग भारतातील विविध प्रदेशांमध्ये वेगवेगळा होता. त्यामुळे शस्त्रांच्या इतिहासाचा अभ्यास करताना कालखंड, प्रादेशिक संस्कृती आणि उपलब्ध पुरातत्त्वीय पुरावे यांचा विचार करणे आवश्यक आहे.

साहित्यिक परंपरेतील शस्त्रे

वैदिक साहित्यामध्ये धनुष्य, बाण, परशू, भाले आणि संरक्षणात्मक उपकरणांसंबंधी उल्लेख आढळतात. धनुष्य-बाण हे दूरच्या लक्ष्यावर प्रहार करण्यासाठी महत्त्वाचे शस्त्र होते. परशू आणि इतर धारदार शस्त्रे जवळच्या संघर्षासाठी वापरली जात असत. वर्मन् आणि कवच यांसारख्या संज्ञा संरक्षणात्मक साधनांच्या अभ्यासासाठी उपयुक्त आहेत. रामायण आणि महाभारत या महाकाव्यांमध्ये शस्त्रांचा विस्तृत संदर्भ आढळतो. रामायणातील धनुष्य-बाणांचा वापर, महाभारतातील अर्जुनाचे गांडीव धनुष्य आणि भीम-दुर्योधन यांचे गदायुद्ध ही त्याची प्रसिद्ध उदाहरणे आहेत. या ग्रंथांमध्ये युद्धकौशल्य, पराक्रम, युद्धनीती आणि योद्ध्यांच्या नैतिक जबाबदाऱ्यांचेही चित्रण केले आहे. कौटिलीय अर्थशास्त्रात सैन्यव्यवस्था, संरक्षण, दुर्गरचना आणि युद्धनीती यांचा विचार केला आहे. अग्निपुराणाच्या धनुर्वेद विषयक प्रकरणांतही शस्त्रे आणि युद्धकौशल्याशी संबंधित माहिती मिळते. या ग्रंथांचा अभ्यास करताना त्यांचा काल, साहित्यिक स्वरूप आणि ऐतिहासिक संदर्भ विचारात घेणे महत्त्वाचे आहे.

शस्त्रांचे वर्गीकरण

प्राचीन भारतीय शस्त्रांचे वर्गीकरण त्यांच्या वापरण्याच्या पद्धतीनुसार आणि साहित्यिक परंपरेतील संकल्पनांनुसार करता येते.

- मुक्त: हातातून किंवा प्रक्षेपण साधनातून सोडले जाणारे शस्त्र.
- अमुक्त: हातात धरून प्रत्यक्ष प्रहार करण्यासाठी वापरले जाणारे शस्त्र.
- मुक्तामुक्त: हातात धरून तसेच फेकून वापरता येणारे शस्त्र.
- मंत्रमुक्त: मंत्राच्या साहाय्याने प्रयोग केले जाते असे वर्णन असलेले अस्त्र.

या चार प्रकारांचा उल्लेख नीतिप्रकाशिकेत आढळतो; परंतु वसिष्ठीय धनुर्वेदसंहितामध्ये पाचवा यंत्रमुक्त असा प्रकार दिलेला आहे. अग्निपुराणात यंत्रमुक्त, पाणिमुक्त, मुक्तसंधारित, अमुक्त आणि बाहुयुद्ध असे पाच प्रकार दिलेले आढळतात. ब्रह्मास्त्र, पाशुपतास्त्र, नारायणास्त्र, आग्नेयास्त्र, वारुणास्त्र यांसारखी दिव्यास्त्रे वाल्मीकी रामायण- महाभारताच्या साहित्यिक परंपरेतील महत्त्वाची उदाहरणे आहेत. याशिवाय वैशंपायनप्रणीत नीतिप्रकाशिका, शुक्रनीती, कौटिलीय अर्थशास्त्र वगैरे ग्रंथात भारतीय शस्त्रांच्या विषयी माहिती मिळते.

शिल्पकला आणि मूर्तिशास्त्रातील आयुधे

भारतीय मंदिरशिल्पे आणि देवप्रतिमांमध्ये शस्त्रांना विशेष स्थान आहे. विष्णूचे सुदर्शनचक्र आणि गदा, शिवाचा त्रिशूल, दुर्गेची विविध आयुधे आणि परशुरामाचा परशू ही त्याची उदाहरणे आहेत. या आयुधांचे महत्त्व केवळ युद्धापुरते मर्यादित नसून ते दैवी सामर्थ्य, संरक्षण, धर्मरक्षण आणि दुष्टशक्तींवरील विजय यांचे प्रतीक म्हणूनही पाहिले जाते. बदामी, ऐहोळे, पट्टदकल आणि वेरूळ यांसारख्या कलाकेंद्रांतील शिल्पांचा तुलनात्मक अभ्यास केल्यास आयुधांचे आकार, रचना आणि प्रादेशिक कलाशैली यांविषयी माहिती मिळू शकते. मात्र, शिल्पांमध्ये दाखविलेल्या आयुधांना प्रत्यक्ष ऐतिहासिक शस्त्रांचे अचूक नमुने मानण्यापूर्वी त्यांची पुरातत्त्वीय वस्तूंशी तुलना करणे आवश्यक आहे.

शस्त्रांचे तांत्रिक आणि सामाजिक महत्त्व

प्राचीन भारतीय शस्त्रनिर्मितीचा संबंध धातुकर्म, कारागिरी, व्यापार आणि संसाधनांच्या उपलब्धतेशी होता. शस्त्रांची निर्मिती, देखभाल आणि सैन्याला पुरवठा करण्यासाठी कुशल कारागीर आणि संघटित उत्पादनव्यवस्था आवश्यक होती. शस्त्रे राजकीय सत्तेचे, सैनिकी क्षमतेचे आणि योद्ध्याच्या प्रतिष्ठेचे प्रतीकही बनली. शस्त्रांचा अभ्यास करताना आक्रमक आयुधांबरोबरच कवच आणि इतर संरक्षणात्मक साधनांचाही विचार करणे गरजेचे आहे. शस्त्रांचे स्वरूप, वापरण्याची पद्धत आणि उत्पादनतंत्र यांतील बदलांमुळे युद्धकौशल्य आणि सैन्यव्यवस्थेवरही परिणाम झाला. धारदार शस्त्रांमध्ये तलवार, खड्ग व कट्यार यांचा उपयोग कापण्यासाठी व भोसकण्यासाठी केला जात असे. भोसकणाऱ्या शस्त्रांमध्ये भाला, शूल, बरची यांचा प्रत्यक्ष प्रहारासाठी किंवा फेकण्यासाठी होत असे. प्रक्षेपणास्त्रांमध्ये धनुष्य-बाण आणि इतर फेकण्याच्या अस्त्रांचा समावेश होतो. आघात करणाऱ्या शस्त्रांमध्ये गदा व मुद्गर यांचा जोरदार प्रहार करण्यासाठी तर कुऱ्हाडवर्गीय शस्त्रांमध्ये परशू व युद्धकुऱ्हाडी यांचा वापर कापण्यासाठी आणि आघात करण्यासाठी होत असे.

निष्कर्ष

प्राचीन भारतीय शस्त्रपरंपरा ही तंत्रज्ञान, युद्धकला, राजकीय व्यवस्था, साहित्य आणि धार्मिक-सांस्कृतिक प्रतीकवाद यांच्या परस्परसंबंधातून विकसित झाली. प्राचीन भारतीय शस्त्रांचा अभ्यास म्हणजे प्राचीन भारतीय समाजाच्या तांत्रिक क्षमता, सांस्कृतिक कल्पना, कलात्मक अभिव्यक्ती आणि सामरिक विचारविश्वाचा शोध आहे. या विषयाचा शास्त्रीय अभ्यास करताना साहित्यिक वर्णने, प्रतिमात्मक पुरावे आणि प्रत्यक्ष पुरातत्त्वीय अवशेष यांच्यातील फरक लक्षात घेणे आवश्यक आहे. मुक्त, अमुक्त, मुक्तामुक्त आणि मंत्रमुक्त या संज्ञांचा अर्थही संबंधित ग्रंथांच्या संदर्भात तपासला पाहिजे. साहित्य, पुरातत्त्व, धातुकर्म, इतिहास आणि प्रतिमाविज्ञान यांच्या समन्वित अभ्यासातून प्राचीन भारतीय शस्त्रांचा अधिक वस्तुनिष्ठ आणि सखोल इतिहास मांडता येऊ शकतो. रामायण, महाभारत आणि इतर प्राचीन ग्रंथांतील शस्त्रविषयक वर्णनांची पुरातत्त्वीय अवशेषांशी तुलना केल्याने साहित्यिक परंपरा आणि ऐतिहासिक पुरावे यांच्यातील संबंध स्पष्ट होतात. त्याचप्रमाणे, शिल्पे, चित्रे आणि मूर्तींमधील आयुधांचे स्वरूप व प्रतीकात्मक अर्थ अभ्यासल्याने भारतीय कला इतिहास आणि प्रतिमाशास्त्राचे आकलन अधिक व्यापक होते. भारतीय शस्त्रपरंपरेची वैशिष्ट्ये आणि जागतिक युद्धतंत्राच्या इतिहासातील तिचे स्थान अधोरेखित करण्यासाठी हा अभ्यास उपयुक्त ठरतो. एकूणच, प्राचीन भारतीय शस्त्रांचा अभ्यास इतिहास, पुरातत्त्व, कला इतिहास, साहित्य आणि पारंपरिक तंत्रज्ञान या क्षेत्रांमध्ये नवीन संशोधनाच्या संधी निर्माण होऊ शकतात.

संदर्भ 1. पाटणकर, गो. वि. "अस्त्रविद्या, प्राचीन." मराठी विश्वकोश. ऑनलाइन लेख. मराठी विश्वकोश प्रथमावृत्ती 2. पंडित, बाळ ज. "धनुर्विद्या." मराठी विश्वकोश. ऑनलाइन लेख. मराठी विश्वकोश प्रथमावृत्ती 3. वझे, कृ. वि. प्राचीन युद्धविद्या. मुंबई, १९३४. 4. Chakravarti, P. C. (१९१४१) The Art of War in Ancient India 5. Elgood Robert (२००४) Hindu Arms and Ritual: Arms and Armour from India, 1400–1865

दिवाळीच्या फटाक्यांचा इतिहास

अद्वैत करजगी

दिवाळी जवळ आली की बाजारपेठांमध्ये रंगीबेरंगी फटाके दिसू लागतात. कुठे फुलबाज्या, कुठे अनार, कुठे आकाशात झेपावणारे रॉकेट, तर कुठे आकाश उजळून टाकणारी आतषबाजी! आज आपल्याला हे सगळे दिवाळीचा अविभाज्य भाग वाटतात. पण कल्पना करून पहा, सुमारे सहाशे वर्षांपूर्वीच्या भारतातही लोकांना आकाशात रंगांची उधळण पाहायला मिळत होती. राजे-महाराजांच्या समारंभांत फटाके उडवले जात होते. ह्या सर्व बाबींमध्ये एक महत्वाचा प्रश्न येतो, की फटाक्यांचा शोध नेमका कुठे लागला? या प्रश्नाचे उत्तर शोधायला गेलो, तर आपल्याला चीनपासून भारतापर्यंत पसरलेला ज्ञानाचा प्रवास, मध्ययुगीन साम्राज्यांचे राजकारण आणि प्राचीन रसायनशास्त्राची एक विलक्षण दुनिया दिसते.

फटाक्यांचा जन्म : स्वयंपाकघरापासून युद्धभूमीपर्यंत!

फटाक्यांच्या इतिहासात सर्वांत महत्त्वाचा पदार्थ म्हणजे दारूगोळ्यात वापरला जाणारा बारूद. बारुदाच्या सुरुवातीच्या प्रकारांच्या विकासात चीनचा मोठा वाटा होता. इ.स.च्या पहिल्या सहस्रकाच्या उत्तरार्धात चिनी रसायनतज्ञ विविध पदार्थांवर प्रयोग करत होते. गंधक, शोरा आणि कोळसा यांसारख्या पदार्थांच्या मिश्रणातून ज्वलनशील मिश्रणे तयार झाली. सुरुवातीला अशा मिश्रणांचा उपयोग धार्मिक समारंभांत, आवाज निर्माण करण्यासाठी आणि नंतर लष्करी कामांसाठी होऊ लागला. बांबू आगीत टाकल्यावर होणाऱ्या कडकडाटापासून फटाक्यांच्या परंपरेची सुरुवात झाली, अशी एक लोकप्रिय ऐतिहासिक मांडणी आहे; मात्र फटाक्यांचा विकास एका दिवसात किंवा एकाच व्यक्तीच्या हातून झाला, असे काही नाही.

चीनमध्ये सॉंग राजवटीच्या काळात, म्हणजे इ.स. ९६० ते १२७९ या कालखंडात, स्फोटक पदार्थांचा युद्धासाठी वापर अधिक विकसित झाला. इ.स. १०४४ मध्ये संकलित झालेल्या वुजिंग झोंगयाओ या लष्करी ग्रंथात बारूदी मिश्रणांची माहिती आढळते. पुढे अग्निबाण, ज्वलनशील गोळे आणि स्फोटक शस्त्रांचा वापर वाढला. विचार करा, ज्या तंत्रज्ञानातून पुढे दिवाळीतील रॉकेट आणि आकाशबाजीसारख्या करमणुकीच्या गोष्टी विकसित झाल्या. त्याच तंत्रज्ञानाचा एक महत्त्वाचा उपयोग शत्रूच्या सैन्याला रोखण्यासाठी केला जात होता. अर्थात, आधुनिक फटाके आणि मध्ययुगीन युद्धसामग्री यांची रचना सारखी नव्हती; पण दोन्हींच्या इतिहासात ज्वलनशील मिश्रणांचे तंत्रज्ञान महत्त्वाचे ठरले.

भारतात फटाके आले तरी कधी?

भारतामध्ये फटाक्यांचा इतिहास सांगताना एक अडचण लक्षात घ्यावी लागते. एखाद्या राजाने फटाके उडवले, याचा उल्लेख मिळणे आणि फटाके भारतात प्रथमच तयार झाले, याचा पुरावा मिळणे या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. तंत्रज्ञान एका प्रदेशातून दुसऱ्या प्रदेशात व्यापारी, कारागीर, प्रवासी आणि सैनिक यांच्या माध्यमातून पोहोचू शकते. त्यामुळे फटाके भारतात नेमके कोणत्या वर्षी आले, कोणी आणले आणि सर्वप्रथम कुठे बनवले, याचे एकच असे निश्चित उत्तर आज उपलब्ध नाही. तरीही मध्ययुगीन भारतातील काही महत्त्वाचे लिखित पुरावे आपल्याला या इतिहासाचा मागोवा घेण्यास मदत करतात.

इ.स.च्या चौदाव्या आणि पंधराव्या शतकांत भारतातील राजकीय परिस्थिती झपाट्याने बदलत होती. दक्षिण भारतात विजयनगरचे साम्राज्य शक्तिशाली होत होते; दख्खनमध्ये बहमनी सल्तनत प्रभावशाली होती; तर उत्तरेत दिल्ली सल्तनतीच्या सत्तेत बदल होत होते. हिंद महासागरातील व्यापारमार्गांवर अरब, पर्शियन आणि भारतीय व्यापाऱ्यांची वर्दळ होती. घोडे, मसाले, मौल्यवान रत्ने, कापड आणि धातूंच्या व्यापाराबरोबरच तंत्रज्ञान व ज्ञानाचाही प्रवास होत होता. बारूद आणि आतषबाजीचे तंत्र अशाच व्यापक संपर्कांच्या पार्श्वभूमीवर भारतात विकसित झाले असण्याची शक्यता आहे.

विजयनगरच्या महानवमीतील आतषबाजी

आता जाऊया पंधराव्या शतकातील दक्षिण भारतात. आजच्या कर्नाटकातील हम्पी परिसरात वसलेले विजयनगरचे साम्राज्य त्या काळात दक्षिण भारतातील एक महत्त्वाचे राजकीय आणि आर्थिक केंद्र होते. राजा देवराय दुसरा याच्या कारकिर्दीत, इ.स. १४४३ मध्ये, अब्दुर रझ्झाक नावाचा फारसी राजदूत विजयनगरला आला.

तो तैमुरी शासक शाहरुखच्या दरबारातून भारतात पाठवण्यात आला होता. त्याच्या प्रवासवर्णनातून आपल्याला त्या काळातील राजधानीचे वैभव, बाजारपेठा, राजदरबार आणि धार्मिक उत्सव यांची माहिती मिळते.

अब्दुर रझ्झाकने विजयनगरमधील महानवमीच्या उत्सवाचे वर्णन केले आहे. या उत्सवात राजकीय सामर्थ्याचे प्रदर्शन, मिरवणुका, सजवलेले मंडप, कलाकारांचे कार्यक्रम आणि विविध करमणुकींचा समावेश होता. त्याच्या वर्णनात आतषबाजीसारख्या मनोरंजनांचाही उल्लेख येतो. म्हणजेच, पंधराव्या शतकातील विजयनगरमध्ये फटाके किंवा तत्सम अग्निक्रीडांचा वापर राजेशाही सोहळ्यांमध्ये होत होता असे दिसते.

क्षणभर कल्पना करा. हंपी परिसर. विस्तीर्ण मैदान, सजवलेले मंडप, हत्तींच्या मिरवणुका, संगीतकार, नर्तक, कुस्तीपटू आणि राजाच्या उपस्थितीत होणारे भव्य समारंभ! अशा वातावरणात आकाशात उडणारे अग्निबाण किंवा रात्री उजेड निर्माण करणारे अग्निक्रीडांचे प्रकार लोकांचे लक्ष वेधून घेत असणार. आज आपल्याला मोबाईलवरून फटाक्यांचे व्हिडिओ पाहता येतात; त्या काळात मात्र प्रत्यक्ष डोळ्यांसमोर दिसणारा असा प्रकाशाचा चमत्कार अधिकच विलक्षण वाटत असेल. विशेष म्हणजे, हे कार्यक्रम पाहणारे लोक केवळ राजघराण्यातील नव्हते; तर अशा मोठ्या सार्वजनिक उत्सवांत सामान्य लोकांचासुद्धा मोठा सहभाग असे.

पण राजे अशा आतषबाजीवर खर्च का करत असत?
कारण राज्यकारभारात राज्याच्या प्रतिमेला मोठे महत्त्व होते. सामर्थ्यवान राजा म्हणजे केवळ युद्ध जिंकणारा सेनापती नव्हे; तो संपत्तीचे प्रदर्शन करू शकणारा, मोठे उत्सव आयोजित करणारा आणि दूरदूरच्या पाहुण्यांना प्रभावित करणारा शासकही होता. विजयनगरसारख्या साम्राज्यात परदेशी राजदूत आणि व्यापारी येत असत. त्यांच्यासमोर सादर केलेले वैभव म्हणजे अप्रत्यक्ष राजकीय संदेशच होता : आमचे राज्य संपन्न आहे, आमच्याकडे कुशल कारागीर आहेत आणि आमची सत्ता प्रभावशाली आहे. म्हणजेच, फटाक्यांची आतषबाजी ही करमणूक असण्याबरोबरच राजकीय प्रतिष्ठेचे साधनही होती!

काश्मीरचा राजा आणि फटाक्यांचा ग्रंथ

फटाक्यांच्या इतिहासातील आणखी एक रंजक व्यक्ती म्हणजे काश्मीरचा सुलतान झैन-उल-आबिदीन. त्याने इ.स. १४२१ ते १४७२ या काळात राज्य केले. काश्मीरच्या इतिहासात त्याचे नाव तुलनेने सहिष्णू आणि विद्या-कलेला प्रोत्साहन देणारा शासक म्हणून घेतले जाते. त्याच्या काळात साहित्य, हस्तकला आणि विविध ज्ञानपरंपरांना प्रोत्साहन मिळाल्याचे उल्लेख आढळतात. विशेष म्हणजे, रामचंद्र काक यांनी Ancient Monuments of Kashmir या ग्रंथात झैन-उल-आबिदीनने फारसी भाषेत फटाक्यांच्या निर्मितीविषयी प्रश्नोत्तरांच्या स्वरूपातील एक ग्रंथ लिहिल्याची नोंद केली आहे. याचा अर्थ असा की, पंधराव्या शतकात आतषबाजीचे ज्ञान केवळ प्रत्यक्ष प्रयोगांमधूनच नव्हे, तर लेखनातूनही जतन केले जात होते. एखादा शासक फटाके कसे बनवायचे याविषयी ग्रंथ लिहितो, ही गोष्ट आज आपल्याला आश्चर्यकारक वाटू शकते. पण मध्ययुगीन राजदरबारांत खगोलशास्त्र, वैद्यक, स्थापत्य, युद्धतंत्र आणि विविध कलांचे ज्ञान महत्त्वाचे मानले जात असे. अर्थात, झैन-उल-आबिदीनच्या या ग्रंथाची संपूर्ण प्रत, त्यातील मजकूर आणि इतर परंपरांशी त्याचे संबंध यांचा अधिक अभ्यास आवश्यक आहे. तरीही या उल्लेखातून आतषबाजीचे तंत्र त्या काळातील विद्वान आणि राजसत्तेच्या कुतूहलाचा विषय होते, हे लक्षात येते.

संस्कृत ग्रंथात फटाक्यांची माहिती!

आता या इतिहासातील सर्वांत महत्त्वाच्या पुराव्यांपैकी एक पाहूया. ओडिशातील गजपती प्रतापरुद्रदेव हा राजा साधारणपणे इ.स. १४९७ ते १५३९ या काळात राज्य करून गेला. कौतुकचिंतामणी हा संस्कृत ग्रंथ म्हणजे त्याची भारतीय विज्ञान विश्वास मिळालेली मोठी देणगीच. या ग्रंथातील राजदरबारी मनोरंजनाशी संबंधित भागात विविध प्रकारच्या आतषबाजीसाठी लागणाऱ्या मिश्रणांची सूत्रे सापडतात. या ग्रंथाचे महत्त्व काय? तर त्या काळातील भारतात फटाके किंवा अग्निक्रीडा केवळ परदेशी प्रवाशांनी पाहिलेली करमणूक नव्हती; त्यांच्या निर्मितीविषयीचे ज्ञान भारतीय भाषेतील ग्रंथांमध्येही नोंदवले जात होते.

कसे होते हे जुने फटाके?

कौतुकचिंतामणीमधील सूत्रांमध्ये गंधक, शोरा, कोळसा आणि लोखंडाची पूड यांसारख्या पदार्थांचा उल्लेख आढळतो. काही सूत्रांत पारा, शिसे किंवा कथील यांसारख्या धातूंचाही संदर्भ आहे. याशिवाय बांबूच्या पोकळ नळ्या, वाती आणि इतर साहाय्यक साहित्याचा उल्लेख येतो. यावरून त्या काळातील आतषबाजीचे तंत्र केवळ आग पेटवण्यापुरते मर्यादित नव्हते; विशिष्ट परिणाम साधण्यासाठी वेगवेगळे पदार्थ आणि साधने वापरण्याचे ज्ञानही अस्तित्वात होते, असे दिसते.

लग्नसमारंभातही उडत होते रॉकेट!

फटाके केवळ राजदरबारांपुरते मर्यादित नव्हते, याचा आणखी एक पुरावा सोळाव्या शतकाच्या सुरुवातीला मिळतो. पोर्तुगीज प्रवासी आणि लेखक दुआर्ते बार्बोसा याने भारतातील विविध प्रदेशांचे वर्णन केले. त्याच्या प्रवासवर्णनाच्या १५१८ मध्ये प्रसिद्ध झालेल्या आवृत्तीत गुजरातमधील एका ब्राह्मण विवाहाच्या संदर्भात नाच, गाणी, आणि रॉकेटसह विविध आतषबाजींचा उल्लेख आढळतो. या नोंदीवरून त्या काळात विवाहासारख्या सामाजिक प्रसंगांतही फटाके वापरले जात होते, असे दिसते.

याचा विचार करा : आज लग्नात वरात निघाली की डीजे, रोषणाई आणि फटाक्यांचा कार्यक्रम दिसतो. पाचशे वर्षांपूर्वी संगीत आणि मिरवणुकांसोबत आतषबाजीचा वापर होत असल्याचे वर्णन आपल्याला एका परदेशी प्रवाशाच्या लेखनातून मिळते. अर्थात, एका विवाहाचे वर्णन म्हणजे संपूर्ण भारतात प्रत्येक लग्नात फटाके उडवले जात होते, असा त्याचा अर्थ नाही. पण अशा करमणुकीसाठी आवश्यक साहित्य उपलब्ध होते आणि त्याचा वापर सामाजिक समारंभांत होत होता, याचा हा महत्त्वाचा पुरावा आहे. फटाक्यांचा इतिहास त्यामुळे राजवाड्यांबाहेर येऊन समाजजीवनाशीही जोडला जातो.

विजयनगरच्या हत्तींपासून

मलाक्काच्या कारागिरांपर्यंत

इटालियन प्रवासी लुदोविको दी वार्तेमा याने इ.स. १५०२ ते १५०८ या काळातील आपल्या प्रवासवर्णनात दक्षिण आणि आग्नेय आशियातील काही प्रदेशांची माहिती दिली. विजयनगरच्या संदर्भात त्याने तेथील लोकांना आतषबाजी बनवण्याचे कौशल्य असल्याचे नमूद केले. हत्ती आगीला घाबरतात आणि त्यामुळे कधी कधी पळ काढतात, असा त्याने उल्लेख केला होता असे वाचनात येते. वार्तेमाने सुमात्रा आणि मलाक्का परिसरातील लोकांच्या आतषबाजीविषयक कौशल्याचाही उल्लेख केला. यावरून त्या काळात दक्षिण आणि आग्नेय आशियातील सागरी संपर्कांच्या प्रदेशांत अशा तंत्रज्ञानाची माहिती पसरलेली होती, असे सूचित होते. भारत, श्रीलंका, मलाक्का आणि इतर बंदरांदरम्यान व्यापारी जहाजांची ये-जा होत असे. व्यापारी आपल्या मालाबरोबर भाषा, कल्पना, कौशल्ये आणि तांत्रिक ज्ञानही एका प्रदेशातून दुसऱ्या प्रदेशात घेऊन जात असत.

फटाके, युद्ध आणि बदलते राजकारण

फटाक्यांचा इतिहास युद्धतंत्रापासून वेगळा करता येत नाही. बारूदाच्या साहाय्याने तयार केलेली शस्त्रे मध्ययुगीन युद्धपद्धती बदलत होती. तोफा, बंदुका, अग्निबाण आणि इतर ज्वलनशील शस्त्रांचा वापर वाढू लागल्यावर राज्यांना नव्या प्रकारचे कारागीर, धातुकाम करणारे तज्ज्ञ आणि युद्धसामग्री तयार करणारे कुशल कामगार आवश्यक झाले. भारतात बहमनी सल्तनत, विजयनगरचे साम्राज्य, पुढे मुघल सत्ता आणि विविध प्रादेशिक राज्ये यांच्यातील संघर्षांच्या काळात अग्निशस्त्रांचे महत्त्व वाढत गेले. अकबराच्या काळातील आइने-अकबरीसारख्या ग्रंथांत शाही सैन्य, शस्त्रे आणि प्रशासनाविषयी माहिती मिळते. या काळात बंदुका आणि तोफखान्याचा वापर केवळ युद्धापुरता नव्हता; शिकारीतही बंदुकांचा वापर होत असे. आतषबाजी आणि युद्धसामग्री यांच्यात काही तांत्रिक समानता असली, तरी दोन्हींचे उद्देश वेगळे होते. युद्धात शत्रूला इजा पोहोचवणे किंवा त्याची संरक्षणव्यवस्था भेदणे महत्त्वाचे होते; उत्सवात प्रकाश, आवाज आणि दृश्य परिणाम निर्माण करणे महत्त्वाचे होते. एकाच मूलभूत तंत्रज्ञानातून किती वेगवेगळे उपयोग विकसित होऊ शकतात, याचे हे उत्तम उदाहरण आहे.

दिवाळीतील फटाक्यांचा इतिहास आणि आजचा प्रश्न


आज फटाके म्हटले की दिवाळीची आठवण प्रथम येते आणि नंतर वर्ल्ड कप ची. परंतु इतिहासात आतषबाजीचा वापर राजदरबारातील समारंभ, विवाह, सार्वजनिक उत्सव

आणि इतर प्रसंगांतही होत असे. या इतिहासातून आपल्याला आणखी एक गोष्ट समजते : विज्ञान आणि तंत्रज्ञान हे केवळ प्रयोगशाळांमध्ये विकसित होत नाही. व्यापारी मार्ग, युद्धे, राजदरबार, कारागिरांचे कौशल्य, भाषांतर आणि ग्रंथलेखन यांचाही त्यात मोठा वाटा असतो. चीनमधील बारूदी तंत्रज्ञानाचा विकास, भारतातील आतषबाजीचे वर्णन करणारे प्रवासी, काश्मीरच्या सुलतानाशी संबंधित फारसी ग्रंथ आणि ओडिशातील संस्कृत सूत्रे—या सर्वांचा एकत्रित अभ्यास केल्यावर इतिहासाचे अधिक व्यापक चित्र समोर येते. त्यामुळे पुढच्या वेळी आकाशात फटाका फुटताना दिसला, तर त्याकडे केवळ काही सेकंदांचा झगमगाट इतक्याच नजरेने पाहू नका. त्यामागे शतकानुशतके चाललेले प्रयोग, कारागिरांचे ज्ञान, राजांचे वैभव आणि आशिया-युरोपमधील संपर्कांची एक मोठी कहाणी दडलेली आहे!

संदर्भ- पी. के. गोडे, The History of Fireworks in India Between A.D. 1400 and 1900 (१९५८)

भारतविद्या अभ्यासक

डॉ. विष्णू श्रीधर वाकणकर



भारतीय इतिहास आणि पुरातत्त्व क्षेत्रातील एक असं नाव, ज्यांनी आयुष्यभर आर्थिक अडचणी आणि शासकीय उदासीनतेचा सामना करत भारताच्या प्राचीन संस्कृतीचा शोध घेतला अन् ती जपली.


मध्य प्रदेशात जन्मलेल्या या द्रष्ट्या संशोधकाने भारताला अन् जगाला थक्क करणारे अनेक शोध लावले. त्यातील सर्वांत ऐतिहासिक शोध म्हणजे 'भीमबेटका येथील रॉक शेल्टर्स' (गुहाचित्रे). त्यांनी तिथे सखोल उत्खनन केले, तिथल्या दुर्मीळ चित्रांची नोंद घेतली आणि जगभरात त्यावर संशोधन सादर केले.
त्यांचा शोधप्रवास फक्त भीमबेटकापुरता मर्यादित नव्हता: महाकवी कालिदासांच्या वस्तूंचे संशोधन: कालिदासांच्या साहित्यात आलेल्या ऐतिहासिक ठिकाणांचा अचूक शोध त्यांनी घेतला.

जागतिक भ्रमंती: जगभरातील अनेक देशांत फिरून त्यांनी प्राचीन कलावस्तू शोधल्या अन् त्यांचे प्रदर्शन भरवले.

सरस्वती नदी प्रकल्प: वैदिक काळातील लुप्त झालेली सरस्वती नदी ही निव्वळ एक काल्पनिक कथा नसून ती खरोखर अस्तित्वात होती, हे सिद्ध करण्यासाठी त्यांनी महत्त्वाकांक्षी संशोधन मोहिमेचे नेतृत्व केले.

आपल्या उत्तुंग संशोधनासोबतच ते रा. स्व. संघ (RSS) आणि 'संस्कार भारती' यांसारख्या सामाजिक-सांस्कृतिक संस्थांशी मनापासून जोडलेले होते. पुरातत्त्व क्षेत्रातील त्यांच्या अभूतपूर्व योगदानाबद्दल भारत सरकारने १९७५ मध्ये त्यांना 'पद्मश्री' या सर्वोच्च नागरी पुरस्काराने सन्मानित केले. आज त्यांनी लिहिलेली पुस्तके, आंतरराष्ट्रीय संशोधन आणि त्यांच्या नावाने दिला जाणारा प्रतिष्ठित सरकारी पुरस्कार यांच्या माध्यमातून डॉ. वाकणकर सरांचा वारसा आजही तितक्याच अभिमानाने जिवंत आहे !

शब्द कोडे



आडवे शब्द

१ भगवान विष्णूचा कुऱ्हाड घेतलेला अवतार
५ काशीचा क्षेत्रपाल xx भैरव
६ गोव्यामध्ये जेसुइट मिशनरींच्या कलम प्रयत्नांनी तयार झालेले फळ
९ भाताबरोबर खाण्याचा पदार्थ
१० दक्षिण भारतातील एक लोकप्रिय खाद्यपदार्थ
१४ अर्थशास्त्र या महान ग्रंथाचा लेखक
१५ विचार, भावना, इच्छा आणि संकल्प यांच्याशी संबंधित मानवी अंतःकरणातील घटक
१७ मध्ययुगीन महाराष्ट्रात जमीनदारीच्या अधिकाराशी संबंधित असलेल्या व्यक्ती
१८ मराठ्यांचा सीमोल्लंघनाचा दिवस
२० उत्तर भारतातली राजे, किल्ले, महाल आणि शौर्यासाठी प्रसिद्ध असलेली एक योद्धांची जमात
२१ पंचमहाभूतांपैकी एक तत्व
२२ प्राचीन काळी लढाईत उपयोगी येणारा प्राणी
२४ शरीर, रामायणातील एक राक्षस अतीxx
२६ महाभारतातल्या कौरवांची राजधानी
२८ शिवाचे एक वाद्याशी संलग्न असलेले नाम
२९ लढाईचे मैदान


उभे शब्द

१. महाबलीपुरम येथील प्रसिद्ध 'रथ मंदिरे' ज्यांच्या राजघराण्याच्या काळात बांधली गेली त्या साम्राज्याचे नाव.
२. रावणाची बहीण
३. व्यासमुनींनी रचलेले जगातील सर्वात मोठे महाकाव्य
४. स्वामी, मालक किंवा देवाच्या सेवेत असणारा निष्ठावंत सेवक
५ मुस्लिम समुदायाचे एक महत्त्वाचे प्रार्थना स्थळ
७. प्राचीन साहित्यात वापरला गेलेला 'पवित्र' किंवा 'पावन' या अर्थाचा शब्द
८. उन्हाळ्याच्या ऋतूत भारतीय घरांमध्ये आवडीने खाल्ला जाणारा खाद्यपदार्थ.
११. गौतम बुद्ध ज्या प्राचीन राजघराण्याशी किंवा कुळाशी संबंधित होते, ते प्रसिद्ध प्राचीन घराणे.
१३. हनुमानाचे दुसरे नाव
१६. नृत्य करणारा शिव
१९. मुख्य ते हरी कथा निरूपण, दुसरे ते xxxxx.
२२. विलंबित, द्रुत, मध्य हे ज्याचे प्रकार आहेत तो संगीतातील अविभाज्य घटक
२३. विष्णूचे वाहन
२४. अष्टविनायकांशी संबधित एका मंगलाष्टकांची सुरुवात या शब्दाने होते
२६. भारतीय तत्त्वज्ञानात ह्या व्यक्तीला देवांपेक्षाही श्रेष्ठ मानले आहे.
२७. विष्णूचे दुसरे नाव
२८. मराठीत नगराला समानार्थी शब्द

Pāthey
Exploring the paths of ancient wisdom

आपले अभिप्राय आणि सूचनांचे स्वागत आहे


भारताचा शाश्वत ज्ञानकोश
सांस्कृतिक आणि बौद्धिक परंपरेचा जागतिक गौरव


युनेस्को 'मेमरी ऑफ द वर्ल्ड' - एक ऐतिहासिक दखल
१९९२ मध्ये सुरू झालेल्या या जागतिक उपक्रमाच्या आशिया-प्रशांत प्रादेशिक यादीत भारताच्या तीन अमूल्य हस्तलिखितांचा समावेश करण्यात आला आहे.
हा केवळ ऐतिहासिक ठेवा नाही, तर मानवजातीला दिशा देणारा जागतिक वारसा आहे.


जागतिक मान्यतेचे ५ सुवर्ण निकष
१. ऐतिहासिक महत्त्व : काळाचा अचूक वेध आणि दस्तावेजीकरण.
२. जागतिक प्रभाव : भौगोलिक आणि सांस्कृतिक सीमा ओलांडणारा व्यापक परिणाम.
३. दुर्मिळता आणि वेगळेपणा : मानवी इतिहासातील अद्वितीय आणि दुर्मिळ ज्ञानभांडार.
४. स्वरूप आणि शैली : उत्कृष्ट मांडणीकरण आणि भौतिक रचना.
५. सामाजिक आणि आध्यात्मिक मूल्य : मानवी जीवनावर आणि समाजावर पडलेला सखोल प्रभाव.


राजतरंगिणी : काश्मीरचा प्राचीन इतिहास
कल्हण लिखित - १२ वे शतक (११४८-११५०)
पहिली ऐतिहासिक नोंद : केवळ दंतकथा नाही, तर भारताचा पहिला पद्धतशीर आणि कालक्रमानुसार लिहिलेला इतिहास.
व्यापक दृष्टी : राजकीय, सामाजिक, आर्थिक आणि प्रशासकीय घडामोडींचा सूक्ष्म वेध.


कौटिलीय अर्थशास्त्र : भारतीय अर्थशात्रीय विचारांची श्रीमंती
राज्यशास्त्र, अर्थशास्त्र आणि कूटनीतीचा भक्कम पाया
रचना : १५ अधिकरणे आणि १५० अध्याय.
केंद्रीभूत विचार : सुदृढ अर्थव्यवस्था आणि सुरक्षित राज्यविस्तार.
पुनरुज्जीवन : १९०९ मध्ये डॉ. आर. शामशास्त्री यांनी प्रकाशित केलेले ओरिएंटल रिसर्च इन्स्टिट्यूट, म्हैसूर येथील हस्तलिखित.


महाभारत : मानवी जीवनाला व्यापणारे महाकाव्य
भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंदिर (BORI) ची अद्वितीय चिकित्सक आवृत्ती
अतुलनीय वारसा : १९१९ ते १९६६ या काळात १२५५ हस्तलिखितांवरून तयार झालेली जगातील सर्वात मोठी चिकित्सक आवृत्ती.
विस्तार : ७३,००० पृष्ठे; सव्वा लाख श्लोकांमधून ८९,००० श्लोकांची केलेली अचूक निश्चिती.
तत्त्वज्ञान : 'असा कोणताही मानवी भाव किंवा प्रसंग नाही, जो महाभारतात नाही.'


तीन ग्रंथ, तीन दिशा, एक महान सभ्यता
ग्रंथ | मुख्य विषय | कालखंड / आवृत्ती | जतन करणारी संस्था
राजतरंगिणी | पद्धतशीर इतिहास आणि प्रशासन | १२ वे शतक (११४८-११५०) | -
कौटिलीय अर्थशास्त्र | राज्यशास्त्र, अर्थशास्त्र आणि कूटनीती | प्राचीन काळ (१९०९ प्रकाशन) | ओरिएंटल रिसर्च इन्स्टिट्यूट, म्हैसूर
महाभारत | मानवी जीवन, नीतिमत्ता आणि धर्म | प्राचीन काळ (चिकित्सक आवृत्ती: १९१९-१९६६) | भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंदिर, पुणे


भारतीय प्रज्ञेचा परिपूर्ण त्रिकोण
काळ (Time) - राजतरंगिणी (इतिहास आणि वास्तवाचे भान)
समाज (Society) - महाभारत (नीती, धर्म आणि मानवी स्वभाव)
राज्य (State) - अर्थशास्त्र (प्रशासन, अर्थ आणि सामर्थ्य)
संपन्न आणि प्रगत भारतीय संस्कृती
(A Complete Civilization)


हा केवळ इतिहास नाही, तर भविष्याचा पाया आहे.
युनेस्कोचा हा गौरव भारतीयांसाठी केवळ अभिमानाची बाब नाही, तर या अथांग ज्ञानसागराचे जतन करून त्याचे आधुनिक जगात उपयोजन करण्याची मोठी जबाबदारी आहे.
चला, आपल्या या जागतिक बौद्धिक परंपरेचे अभिमानी पाईक होऊया!